**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ४१/२०१३</u>**

**मारुती विरुध्द शिवाजी**

**CNR:MHSN14-000158-2013**

## नि.क्र. १६१ वरील आदेश

१. वादीतर्फे प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी नं. १० यांचे वारस रेकॉर्डवर घेणेकरिता दिलेला आहे. प्रतिवादी नं. १० अनुबाई विष्णू चौगुले/चव्हाण ह्या दिनांक ११/१०/२०२३ रोजी मयत झालेल्या आहेत व त्यांना अर्जात नमूद केलेप्रमाणे नं. १ ते ४ हे कायदेशीर वारस असून त्यांना रेर्कार्डवर घेणेची विनंती केलेली आहे.

२. सदर अर्जावर प्रतिवादींतर्फे म्हणणे दिले असून त्यांनी मयत प्रतिवादींना अर्जात नमूद वारस असलेबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केला नसल्याने अर्ज फेटाळणेत यावा असे म्हणणे दिलेले आहे.

३. वादींचा अर्ज, त्यावर प्रतिवादी यांनी दिलेले म्हणणे व दोन्ही बाजूंच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणाचे अवलोकन केले. वादींनी प्रतिवादींच्या विरुध्द दावा मिळकतीचे वाटपाकरिता व ताकीदीकरिता प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. प्रतिवादी नं. १ तर्फे नि.क्र. १६० अन्वये प्रतिवादी नं. १० श्रीमती अनुबाई विष्णू चौगुले (चव्हाण) या दिनांक ११/१०/२०२३ रोजी मयत झाल्या आहेत अशी पुरसिस दिलेली आहे. प्रस्तुतचा दावा वाटपाकरिता असल्यामुळे मयतांचे वारसांचा देखील दावा मिळकतीमध्ये हक्क आहे. त्यामुळे दावा गुणदोषांवर चालण्याकरिता अर्जात नमूद प्रतिवादी नं. १० चे वारस नं. १ ते ४ यांना अभिलेखावर घेणे न्यायोचित होणार आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज नि.क्र. १६१ मंजूर करण्यात येतो.

२. वादींनी कायदेशीर मुदतीमध्ये दाव्यात दुरुस्ती करुन त्याची प्रत दाखल करावी

सही/-

शिराळा

**(श्रीमती व्ही.ए.देसाई)**

दिनांक ०२/१२/२०२३

सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, शिराळा

## <u>C E R T I F I C A T E</u>

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | V. S. Patil |
| Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Shirala |
| Date | : | 02/12/2023 |
| Judgment signed by the Presiding Officer on | : | 02/12/2023 |
| Judgment uploaded on | : | 04/12/2023 |